**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५३ । मंगळवार ७ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# माजी महापौर अभिषेक कळमकरच्या अटकेचे एसपींसमोर आव्हान

## अंतर्गत वादामुळे एलसीबी पूर्णत: निष्प्रभ । कळमकर पाच महिन्यांपासून फरारच

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्हा पोलिस अधीक्षकपदाची सूत्रे हाती घेऊन मुम्मका सुदर्शन हे तब्बल सव्वादोन महिने होऊन स्थिरावले असताना त्यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांच्या विरोधात कडम मोहिम हाती घेतल्याचे पाहण्यास मिळत आहे. जिल्हातंर्गत पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्याही करुन भाकरी फिरवीली आहे. मात्र प्रत्यक्षात ग्राऊंडवर जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करुन भाजपने पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर विनापरवाना आंदोलन उभे केले असताना बलत्कारासारख्या गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या माजी महापौर अभिषेक कळमकरसारखा आरोपी पोलिसांच्या हाती लागत नसल्याने पोलिसांच्या कार्यक्षतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या नाकावर टिच्चून अभिषेक कळमकर याने परदेशात पलायन केले आहे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.



### एलसीबीतील अंतर्गत वादाचा फटका

अभिषेक कळमकरवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर तोफखाना पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. त्यांच्याकडून तपासात गती नसल्याने तत्कालीन पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी एलसीबीकडे गुन्हा वर्ग केला. आरोपीविरुध्द न्यालयात ५ एप्रिलला कायमस्वरुपी अटक आदेश म्हणजेच स्टिँडिंग वॉरंड जारी करण्यात आले. स्टँडिंग वॉरंटनंतर तो मिळून न आल्याने न्यायालयाने त्याला फरार घोषित केले. दिनांक १६ मे रोजीपर्यंत न्यायालयात किंवा पोलिसांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले. या मुदतील हजर न झाल्याने त्याची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश देण्यात आले. मात्र कळमकर शरण आला नसून त्याला पोलिसही अद्याप पकडू शकले नाहीत. याचाच अर्थ गेल्या दोन–सव्वा दोन महिन्यांपासून एलसीबीतील अंतर्गत वादाचा फटका या गुन्ह्यात झाला असून पीडित तरुणीने याप्रकरणी आरोपीच्या अटकेसाठी आंदोलनही केले. मात्र पोलिसांकडून अद्यापही कळमकरच्या मुसक्या अवाळल्या गेल्या नाही.

### पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी अजूनही विद्यमान!

एकेकाळी नैतिकतेच्या मुद्यावर आरोप झाला तर मोठमोठे नेते आपल्या पदाचा राजीनामा देत असत. त्यानंतरच्या काळात अशा गोष्टी जर समोर आल्या तर पक्षाकडून त्यांची पदावरुन हकालपट्टी केली जात असे. मात्र बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यामध्ये फरार असणाऱ्या अभिषेक कळमकर याने ना स्वत: राजीनामा दिला ना पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्याची शहर जिल्हाध्यक्षपदावरुन हकालपट्टी केली.तसेच महिलांच्या प्रश्नावरून विरोधकांवर कायम बोलणा–या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही चुप्पी धरल्याने पक्षाच्या धोरणाबद्दलही शंका उपस्थित होत आहेत.

### पारनेरमध्ये अंधारात नाट्य, एलसीबीला गुंगारा

अभिषेक कळमकरच्या गुन्ह्यातील प्रत्यक्ष साक्षीदार लकी कळमकर याला पोलिसांनी ९ मार्चला पारनेरमध्ये अटक केली. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन तो पोलिसांच्या हाती तुरी देऊन पसार झाला होता. लकीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या, पण अभिषेक मात्र एलसीबीच्या पथकाला गुंगारा देण्यात यशस्वी ठरला. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### अभिषेकचे परदेशात पलायन?

आरोपी कळमकर हा अटकपूर्व जामीनसाठी जिल्हा तसेच उच्च न्यायालयामध्ये कळमकर तीन वेळा अर्ज दाखल करतो, वकीलपत्रावर सह्या करण्यासाठी तो वकिलाला वारंवार भेटतो, पण पोलिसांना सापडत नाही. दिनांक २९ जूनला जामीन फेटाळल्यानंतर त्याचा पोलिसांनी शोध घेण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. मात्र त्याआधीच त्याने एसपी सुदर्शन यांच्या महत्वाच्या असलेल्या एलसीबीच्या नाकावर टिच्चून विदेशात पलायन केल्याची जोरदार चर्चा आहे. एखाद्या सदराईत गुन्हेगारापेक्षाही अधिक सराईत कळमकर गुन्हा दाखल होऊन १३० हून अधिक दिवस उलटले तरी देखील पोलिसांना गुंगारा देत आहे. गुंतागुंतीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये आरोपींना तत्परतेने अटक करण्यात एलसीबी पूर्णत: निष्प्रभ ठरली आहे. सध्या एलसीबीला पोलिस निरीक्षक म्हणून प्रभारी अधिकारी नवे असले तरी त्यांना या गुन्ह्याची पुर्ण कल्पना आहे. त्यामुळे त्यांनी या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीच्या मुस्क्या आवळणे आवश्यक आहे.



# जलजीवन गैरव्यवहारप्रकरणी चार अधिकाऱ्यांचे निलंबन

## । जनतेच्या हक्काच्या पाण्यासाठीच्या लढ्याला यश । खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत सन २०२२–२३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध ग्रामीण पाणीपुरवठा योजनांमधील कथित गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेतील अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि प्रशासकीय हलगर्जीपणाविरोधात सातत्याने आवाज उठविल्यानंतर राज्य शासनाने मोठी कारवाई करत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील दोन कार्यकारी अभियंते व दोन उपअभियंत्यांना निलंबित केले आहे. जनतेच्या हक्काच्या पाण्यासाठी उभारलेल्या लढ्याचा हा महत्त्वाचा टप्पा असल्याची प्रतिक्रिया अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली.

राज्य शासनाने निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता जी. एस. भोगावडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता एस. आर. वारे, उपअभियंता एस. एस. दहिफळे आणि तत्कालीन उपअभियंता एम. पी. धगधगे यांचा समावेश आहे. जलजीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये गंभीर त्रुटी, अनियमितता आणि निष्काळजीपणा आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

■ पान ४ वर

# महावितरणाने दखल न घेतल्यानेच दुर्दैवी घटना घडली – आ.संग्राम जगताप

## स्टेशन रोड आनंदनगर येथील चिमुरडी प्रीती गांगर्डेचा विजेच्या खांबाच्या शॉकने मृत्यू; महावितरणविरोधात पाच तास ठिय्या आंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्टेशन रोड परिसरातील आनंदनगर येथे राहणाऱ्या अवघ्या चिमुरडी प्रीती गांगर्डे हिचा महावितरणच्या विजेच्या खांबाला शॉक लागून जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याने शहरभर हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालयातील अधीक्षक अभियंता यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले. संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, या मागणीसाठी आंदोलनकर्त्यांनी तब्बल पाच तास आंदोलन सुरू ठेवले.

या आंदोलनात आमदार संग्राम जगताप स्वतः सहभागी झाले. त्यांच्या उपस्थितीत महावितरण प्रशासनाशी चर्चा झाली. अखेर महावितरणकडून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी स्वरूपाचे पत्र देण्यात आले. तसेच काही अधिकारी गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात रवाना झाल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.




यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''आम्ही जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलन करत आलो

■ पान ४ वर

# अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिव पाणंद जनजागरण यात्रेला प्रारंभ

## शिव पाणंद संघर्षयोद्धा पुरस्काराने कार्यकर्त्यांचा गौरव । प्रत्येक शेताला दर्जेदार शेतरस्त्याचा निर्धार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी या ध्येयवाक्याने प्रेरित महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने आदर्शगाव राळेगणसिद्धी येथे पद्मभूषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिवपाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा व पदाधिकारी सन्मान अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्यभरातील शेतरस्त्यांच्या लढ्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संघर्षयोद्ध्यांचा शिव पाणंद संघर्षयोद्धा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.




चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अण्णा हजारे यांच्या पाठिंब्यामुळे शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून मिशन झिरो पेण्डन्सी च्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक गरजवंत शेतकऱ्याला हक्काचा दर्जेदार आणि चिखलमुक्त सिमेंट काँक्रीटचा शेतरस्ता मिळवून देण्यासाठी चळवळ अधिक वेगाने पुढे नेली जाईल.

यावेळी त्यांनी, माझा रस्ता होवो न होवो, पण माझ्या शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळेपर्यंत मी थांबणार नाही असा निर्धार व्यक्त करत शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमात शेतरस्त्यांसाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच गावोगावी जनजागृती करून प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे

■ पान ४ वर

# महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात खासदार नीलेश लंकेंचे जनआंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महावितरणच्या कथित निष्काळजी व जनविरोधी कारभारामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी येत्या ८ जुलै रोजी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्याची घोषणा केली आहे.



यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देऊन लंके यांनी आंदोलनापूर्वीच सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मतदारसंघातील अनेक भागांत सुरू असलेले अघोषित व अनियमित लोडशेडिंग, जळालेले ट्रान्सफॉर्मर (डीपी) वेळेत न बदलणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव व चुकीची वीजबिले, अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या वीज यंत्रणेची रखडलेली दुरुस्ती, सौरऊर्जा व नेट मीटरिंग प्रकरणांतील विलंब, तक्रार निवारण यंत्रणेचे अपयश, कृषी वीजजोडणीतील विलंब आणि देखभालीच्या अभावामुळे निर्माण होणारे वारंवार तांत्रिक बिघाड या प्रमुख प्रश्नांकडे त्यांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे.

सौरऊर्जा योजनेसाठी पैसे भरूनही अनेक शेतकऱ्यांना एक ते दोन वर्षे सोलर पॅनेल बसवून मिळत नसल्याचा तसेच काही एजन्सीकडून अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

आंदोलनाद्वारे अघोषित लोडशेडिंग तातडीने बंद करणे, जळालेल्या डीपी कालबद्ध पद्धतीने बदलणे, स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलांची उच्चस्तरीय चौकशी करणे, स्मार्ट मीटर सक्तीचे न ठेवणे, अतिवृष्टीग्रस्त वीज पायाभूत सुविधांची त्वरित दुरुस्ती, सोलर व नेट मीटरिंगची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि कृषी वीजजोडणीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांसमवेत ८ जुलै रोजी लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येणार आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना विधेयकाचा पुनर्विचार न झाल्यास संघर्ष अटळ - डॉ. धनंजय कुलकर्णी



अहिल्यानगर- प्रस्तावित महाराष्ट्र वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना (क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स) विधेयक मधील अनेक तरतुदी एकतर्फी, नोकरशाहीप्रधान व प्रत्यक्ष आरोग्यसेवेच्या वास्तवाशी विसंगत असल्याने शासनाने या विधेयकाचा कलमनिहाय पुनर्विचार करावा, अन्यथा राज्यव्यापी लोकशाही मार्गाने संघर्ष उभारावा लागेल, असा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिला. आयएमएने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नियमनाला विरोध नसून एकतर्फी नियंत्रणाला विरोध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. रुग्णसुरक्षा, दर्जेदार आरोग्यसेवा व पारदर्शकतेला वैद्यकीय क्षेत्राचा पूर्ण पाठिंबा असल्याचे नमूद करत डॉक्टर व आरोग्य संस्थांना विश्वासात घेऊनच कायदा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित विधेयकामुळे ग्रामीण भागातील लहान दवाखाने, नर्सिंग होम्स व मध्यम रुग्णालयांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. विद्यमान नोंदणीकृत रुग्णालयांना पुन्हा तात्पुरत्या नोंदणीची सक्ती करू नये, नोंदणी प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध असावी, आपत्कालीन उपचार करणाऱ्या डॉक्टरांना कायदेशीर संरक्षण मिळावे, तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी कायदा करावा, अशी मागणीही आयएमएने केली आहे.आयएमएचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच अहिल्यानगर शहरातील डॉक्टरांनी पाठिंबा दिला आहे.

### अवतार मेहेरबाबा नगर सेंटर ६७ वर्ष पूर्ण-मेहेरनाथ कलचुरी




अहिल्यानगर - नगरमधील सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर केंद्राला ६७ वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले अशी माहिती सेंटरचे अध्यक्ष डॉ मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली मेहेर बाबाचे जगात सेंटर होते पण नगरमध्ये नव्हते तेव्हा मेहेरबाबानी सेंटर स्थापन करण्याची सूचना केली मग मेहेरप्रेमींच्या घरी दर शनिवारी सेंटर सुरु करावयाचे ठरले पहिला प्रोग्राम माणिक हाथीदारू यांच्या येथे झाला मग शास्त्री मॅडम,भगीरथ तिवारी आदी मेहेरप्रेमींच्या घरी सेंटर झाले असे २० जून पर्यत प्रोग्राम झाले. पण त्याकाळी वाहनांची व संवादाची सुविधा जास्त नवहती त्यामुळे प्रत्येक ठिकाणी जाणे शक्य नव्हते मग आदी इराणी याना जागा मागण्यात आली त्यांनी सरोष पेट्रोल पंपाशेजारील या जागेतील एक खोली दिली २९ जूनला सेंटर भरून पहिला प्रोग्राम झाला व सेंटर सुरु झाले या सेंटरचे उदघाटन अवतार मेहेरबाबानी केले होते. यानिमित्ताने ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये भजन,आरती,प्रार्थना,सुगम संगीत गायन,शास्त्रीय व भक्तीगीत गायन,वादन,कव्वाली गायन,भजने व अभंग वाणी तसेच नृत्य कार्यक्रम सादर केले अशी माहिती सेंटरचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली.

### कोरियातील आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. आशुतोष गारुडकर यांचे संशोधन सादर

अहिल्यानगर- अहिल्यानगरचे प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ डॉ.आशुतोष अरुण गारुडकर यांनी सियोल,दक्षिण कोरिया येथे झालेल्या प्रतिष्ठित २०२६ या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग नोंदवला.यापरिषदेत त्वचारोग,सौंदर्य चिकित्सा,केसांचे उपचार,अँटी-एजिंग आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ सहभागी झाले होते. या परिषदेत डॉ.गारुडकर यांनी''केसगळतीमध्ये एक्सोसोम्स''आणि''चेहऱ्यावरील पिग्मेंटेशनसाठी सर्वात आधुनिक उपचारपद्धती''या विषयांवरील आपले संशोधन कार्य सादर केले.कोरियन स्किन केअर,एक्सोसोम्स,पीडीआरएन,लेझर आणि आधुनिक त्वचा-पुनरुज्जीवन उपचारांबाबत त्यांनी जागतिक तज्ज्ञांशी चर्चा केली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कुशल प्रशासक होत्या – महापौर ज्योतीताई गाडे

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी अठराव्या शतकातच पाणी आडवा व पाणी जिरवा ही संकल्पना प्रत्यक्ष राबवून त्या काळात साठवण तलाव व विहिरींची निर्मिती केली. त्या कुशल प्रशासक म्हणून ही ओळखल्या जायच्या त्यांचाच वारसा घेऊन यापुढे आम्ही अहिल्यानगर शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्करराव भोजने, नगरसेविका शारदाताई ढवण, नगरसेविका दिपालीताई बारस्कर, पतसंस्थेचे चेअरमन साहेबराव कजबे, व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर कजबे, संचालक रानबा कजबे, रामदास लेंडे,गुलाब कसबे, संजीव भोगे, दिलीप तागड, रंजना कसबे, रंजना गायकवाड, कैलास कजबे, सेवानिवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक नवनाथ ठोंबरे, शिवाजी नवले, अश्रुबा नरोटे आदी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. तसेच माजी आमदार कै.अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महापौर गाडे पुढे म्हणाल्या की. या पतसंस्थेने आपल्या सभासदांना अर्थसहाय्य करून स्वावलंबी बनविण्याचे काम केले. या संस्थेने आपल्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव न करता परिसरातील विविध समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

यावेळी नगरसेविका शारदाताई ढवण व नगरसेविका दिपालीताई बारस्कर यांचे भाषण झाले. १९९१ मध्ये संस्थापक कै. बाबुराव पाटील कसबे यांनी सुरू केलेल्या संस्थेची ३७ वी वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी भास्कर पाटील भोजने होते. यावेळी से. नि.जिल्हा विशेष लेखापरीक्षक नवनाथ ठोंबरे यांनी संस्थेच्या एकूण ठेवी ३.५३ कोटी रुपये असून, संस्थेने २.५४ कोटी रुपये कर्ज वाटप केले आहे संस्थेस ३.५४ लाख रुपये नफा झाल्याचे सांगितले. आपल्या संस्थेने आता सोनंतारण सुविधा चालू केल्याचे सांगितले. यावेळी विषय पत्रिकेवर सर्व विषय सभासदांना वाचून दाखवण्यात आले व सर्व सभासदांनी एकमताने सर्व विषय मंजूर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धलपे सर यांनी केले. तर आभार संचालक संजीव भोगे यांनी मानले. सभेस संस्थेचे सर्व संचालक व सभासद उपस्थित होते.

# आषाढी वारी मार्गावर महाअन्नदान सेवेसाठी आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पायी वारी सोहळ्यासाठी पंढरपूरला जाण्याकरिता निघालेल्या दिंड्या आणि वारकऱ्यांना महाअन्नदान करण्याच्या सेवेत सहभागी व्हा, असे आवाहन हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले आहे.

महाअन्नदान सेवेचे हे २१ वे वर्ष आहे. नगर शहरामधून मार्गस्थ होणाऱ्या छोट्या दिंड्यांमधील वारकरी बंधू-भगिनींना भोजनासाठी साहित्य पुरविण्याची सेवा हभप मिलिंद महाराज चवंडके गेल्या २० वर्षांपासून श्रध्देने विनाखंड करत आले आहेत. या महाअन्नदान सेवेत शहरातील भाविकांना सहभागी करून घेणारा हा उपक्रम प्रतीवर्षी भाविकांच्या आणि पंढरपूरकडे चालत असलेल्या वारकऱ्यांचा कौतुकाचा विषय असतो.

आषाढी वारीच्या महाअन्नदान सेवेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शहरातील भाविकांनी आपल्या इच्छेनुसार साखर, गूळ, चहापत्ती, दूध, शेंगदाणे, साबुदाणा, भगर, तांदूळ, गव्हाचे पीठ, बेसन पीठ, तूरडाळ, मुगडाळ, भाजीचे मसाले, शेंगदाणा तेल, बटाटा वेफर्स, राजगिरा लाडू, राजगिरा पट्टी, रवा, पोहे, अंगाचे आणि कपड्यांचे साबण असे अत्यावश्यक साहित्य स्वयंस्फूर्तीने ९४२२४९५२८९ या भ्रमणध्वनीवर संपर्क करून पोहोच करावे, असे आवाहन हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी प्रती वर्षाप्रमाणे केले आहे.

## प्रेमास नकार दिल्याचा राग; विवाहितेचा विनयभंग, अल्पवयीन मुलीला पळवून नेण्याची धमकी, पोक्सोसह गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** ''तू मला आवडतेस, माझ्यासोबत प्रेम कर,'' अशी जबरदस्तीची मागणी करत महिलेच्या घरी दारूच्या नशेत घुसून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना पैठण तालुक्यातील गणेशनगर, पिंपळवाडी पिराची येथे घडली. एवढ्यावरच न थांबता ''तू माझ्याशी बोलली नाही तर तुझ्या मुलीला पळवून नेईन,'' अशी धमकी देत अल्पवयीन मुलीशीही गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश दत्तू शिंदे (वय ३४, रा. वाहेगाव, ता. पैठण) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेच्या तक्रारीनुसार, शनिवारी (दि. ४) रात्री साडेनऊच्या सुमारास आरोपी दारूच्या नशेत तिच्या घरी आला. त्याने महिलेवर प्रेमसंबंध ठेवण्यासाठी दबाव टाकला. महिलेने स्पष्ट नकार दिल्यानंतर आरोपीने शिवीगाळ करत तिचा विनयभंग केला.

त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीकडे वाईट हेतूने जात तिचा हात धरण्याचा प्रयत्न केला. तसेच, ''माझ्याशी बोलली नाही तर तुझ्या मुलीला पळवून नेईन,'' अशी धमकी देत जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ७४, ७८, ७९, ३५१(२), ३५२ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम, २०१२ अंतर्गत कलम ८ व १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जगताप करीत आहेत.

## दलित महासंघाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त १३५ वृक्षारोपण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे यांच्या समतावादी विचारांचा वारसा जपत गेली ३५ वर्षे सामाजिक, न्याय, शिक्षण, स्वाभिमान आणि संविधानिक मूल्यांसाठी कार्यरत असलेल्या दलित महासंघाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने १३५ वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

संघर्ष- संघटन- सामाजिक परिवर्तन या ब्रीदवाक्याला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सामाजिक परिवर्तनासोबत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असे आवाहन केले.

यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, जिल्हा कार्याध्यक्ष कडूबाबा लोंढे, ज्येष्ठ नेते नामदेवराव चांदणे, माजी गटविकास अधिकारी राजेंद्र गर्जे, ज्येष्ठ नेते दिलीप सोळसे, आशपाक पठाण, प्रा. सुनील पाखरे, कैलास वाघमारे, बबनराव शेळके, बबन चव्हाण, सेवानिवृत्त आर्मी जवान दिलावर पठाण, रियाज पठाण, भाऊराव गर्जे, बडेसाहेब पठाण, विलास वाघमारे, सादिक पठाण, पप्पू पठाण, तानाजी भवर, चव्हाण सरपंच, प्रतीक गायकवाड, हरिभाऊ गर्जे, अविनाश लोंढे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण अहिल्यानगर बीड परळी रेल्वेमार्गासाठी संघर्ष उभारणार - दिनेशचंद्र हुलवळे




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** ऐतिहासिक वारसा लाभलेले विद्येचे माहेरघर पुणे व धार्मिक ऐतिहासिक परंपरांनी पावन क्षेत्र नाशिक या दोन्ही शहरांना जोडणारा पुणे-नाशिक रेल्वेमार्ग अर्थात पुणे, हडपसर, चाकण, अहिल्यानगर, राहुरी, शिर्डी आणि नाशिक असा प्रस्तावित आहे.वेळ आणि गती गाड्या ताशी १६० ते २०० किमी वेगाने धावतील, ज्यामुळे २३५ किमीचे अंतर सुमारे २ तासांत पार करणे शक्य होईल हा रेल्वेमार्ग मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकारचे रेल्वेमंत्री व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हार्दिक अभिनंदन केले.

तथापी प्रास्तावित मुंबई लातूर एक्स्प्रेसवे जनकल्याण महामार्गाच्या समांतर कल्याण-मुरबाड माळशेज (दाऱ्याघाट) शिवनेरी-वासुंदे मार्गे अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजूरी देऊन ट्रँगल पूर्ण करावा. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग गतीमान व्हावा. ज्यामुळे हा रेल्वेमार्ग बीड-परळीसह मराठवाड्याच्या विकासाचा राजमार्ग ठरेल. हा रेल्वेमार्ग झाला तर देशाची पश्चिम-पूर्व किणारपट्टी मुंबई-विशाखापट्टनम जोडणारा देशातला सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प साकारला जाईल. तसेच कोंकण,प.महाराष्ट्र, मराठवाड्याला नजिकच्या मार्गाने मुंबईशी जोडणारा हा रेल्वेमार्ग साकारेल.

या रेल्वेमार्गामुळे देशाच्या वैभवात भर पडेल. बीड,परळी,अहिल्य ानगर,जुन्नर,मुरबाडच्या शेतकऱ्याला उत्पन्नाचे जोडमार्ग प्राप्त होतील. अकोले- संगमनेरच्या दक्षिण डोंगराळ भागाचा कायापालट होईल.

माळशेज-शिवनेरी- लेण्याद्री,भिमाशंकर या परिसरात पर्यटन उद्योग वाढेल व त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. शेतकऱ्याला जोडव्यावसायाच्या संधी प्राप्त होतील.पर्यटन उद्योगाला वाव मिळेल, साखर, भाजीपाला, फळे आदी कृषी उत्पादने मुंबई मार्गे देश विदेशात निर्यात करता येतील.त्यातून शेतकऱ्याच्या उत्पन्नात भर पडेल. विदेशी लक्ष्मी समृद्धीच्या मार्गांनी बळीराजाचे दार ठोठावेल. मुंबई-ठाणेची श्रीमंती, पुण्याची विद्वत्ता व अहिल्यानगरचा सहकार या त्रिवेणी संगमातून महाराष्ट्राचे भाग्य रेखाटले जाईल. स्वातंत्रसेनानी स्व.गोविंदभाई श्रॉफ,स्व.खासदार केशरकाकू क्षीरसागर,पत्रकार सुधाकर डोईफोडे, स्व.आमदार श्रीकृष्णराव तांबे, स्व.निवृत्तीशेठ शेरकर, स्व.प्रकाश परांजपे,स्व.शांतारामबापू घोलप, स्व.प्रो.रामभाऊ कापसे, स्व.गोपीनाथ मुंढे,स्व.बाळासाहेब विखेपाटील ,स्व.दिलीप गांधी,स्व.स्वॉलि.गुलाबराव शेळके अशा अनेक दिग्गज नेत्यांनी मागणी केलेल्या या रेल्वेप्रकल्पाच्या मंजूरीसाठी सन १९९६ पासून माळशेज रेल्वे कृति समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करित आहोत.

हा रेल्वेमार्ग व्हावा म्हणून निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा,जनजागरण यात्रा, रेल्वेरथयात्रा, ५ लाख सहयांची मोहिम,दिल्ली यात्रा असे सर्व सोपस्कार माळशेज रेल्वे कृति समितीने पार पाडले. त्यातून सन २००६ साली सर्वेक्षण झाले. तर सन २०१९ पासून मुरबाड पर्यंत पहिला टप्प्या मंजूर झाला. (हा पहिला टप्पा मढ-शिवनेरी पर्यत होणं हे व्यावहारिकदृष्ट्याही सोयीचे आहे. त्यातून मुरबाड, शिवनेरीपर्यंत ५ वी मुंबई विकसीत होईल.) या रेल्वेमार्गासाठी मा.शरद पवार व मा.अण्णा हजारे यांचे आशिर्वाद लाभले.खा.सुप्रियाताई सुळे,शिवाजीराव आढळराव पाटील,खा.भाऊसाहेब वाकचौरे,बाळासाहेब थोरात,शिवाजीराव नलावडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी माळशेज रेल्वे कृति समितीला कायम सक्रिय साथ दिली.महाराष्ट्राच्या सर्वांगिन हितासाठी कल्याण-अहिल्यानगर अर्थात मंजूरीसाठी भविष्यात बीड,परळी पासून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तरुणांचे संघटीत करन संघर्ष उभारणार असा निर्धार माळशेज रेल्वे कृति समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे यांनी व्यक्त केला.

# श्रीरामकृष्णाचा ३९ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाऊंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयाचा ३९ वा वर्धापन दिन ४ जुलै २०२६ रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय श्रीगोपाल धूत होते.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय सुभाष जग्गी आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे तथा संस्थेचे अध्यक्ष माननीय श्रीगोपाल धूत यांनी सद्यस्थितीत संस्काराचे महत्त्व अनन्य साधारण असून संस्कारमय जीवन जगण्याचे आवाहन त्यांनी केले. परमपूज्य डोंगरे महाराजांचा वारसा आपण पुढे चालवत असून तो यापुढे असाच अविरतपणे चालू ठेवण्याची आपणा सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष माननीय मोहनलाल मानधना यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय सुभाष जग्गी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि अशा विविध उपक्रमांमधूनच प्राचीन भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे जतन करण्याचे मोलाचे कार्य विद्यालयात होत असल्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यांचा सत्कार कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष माननीय श्रीगोपाल धूत यांनी केला.

महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष श्रीयुत नंदलाल मणियार यांनी आपल्या मनोगतातून महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्टच्या कार्याची माहिती दिली. इयत्ता दहावीतील कुमारी चैताली चौगुले या विद्यार्थिनीने भगवद्गीता एक शाश्वत सत्य या विषयावर मनोगत व्यक्त केले.

इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थिनींनी'' जग मे सुंदर है दो नाम'',''ये चमक ये धमक'',''जगन्नाथ जगन्नाथ'',''मनात भरली पंढरी''अशा अत्यंत सुरेल भक्ती गीतांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना संगीत शिक्षिका सौ पुष्पा औटी यांनी मार्गदर्शन केले. श्रीयुत शेखर दरवडे, सुजल गावडे, शार्दुल खोल्लम, प्रज्वल साठे, गिरीश दैतुले यांनी साथ संगत केली.

याप्रसंगी इयत्ता पहिली ते बारावी मधील प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. या पारितोषिक वितरणाचे वाचन सौ सुनीता पाटोळे यांनी केले.

कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष , श्रीयुत राजेश झंवर, सचिव डॉ शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक , विश्वस्त लक्ष्मीकांत झंवर, मगन भाई पटेल, पुरुषोत्तमभाई पटेल प्राचार्या गगनप्रीत वाधवा, उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू, प्रांजली भोसले आदी उपस्थित होते. विद्यालयाच्या वाटचालीचा मागोवा उमा जोशी यांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुग्धा देवकर यांनी केले. याप्रसंगी महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्ट तर्फे विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गोरक्षनाथ गडावरून पायी दिंडीचे १४ जुलैला पंढरपूरला प्रस्थान



अहिल्यानगर- येथून जवळच असणाऱ्या मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून सालाबादप्रमाणे दिनांक १४ जुलै रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळा प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली व राम महाराज पोते,वैगोरक्षनाथ महाराज ढोकणे, भाऊसाहेब महाराज हरिचंद्रे व दिंडी सोहळा ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गर्भगिरी डोंगर रांगेतील नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथून १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे,यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दिंडी सोहळ्यात दररोज पहाटे ४ते५ श्री पूजा व अभिषेक,पहाटे ५ते ६आरती व दर्शन दुपारी प्रवचन व रात्री कीर्तन नंतर दिंडी प्रवासात अखंड भजन होणार आहे. ओम चैतन्य गोरक्षनाथ दिंडी सोहळा ट्रस्ट कै दादासाहेब जाधव यांनी स्थापन केला असून नगर मध्ये दिंडीचे स्वागत डॉक्टर प्रकाश जाधव, एम बी धुमाळ करणार आहेत.ज्यांना या दिंडी सोहळ्यात सहभागी व्हायचे त्यांनी गोरक्षनाथ गडावर दिनांक १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता हजर राहावे ,दिंडीत वारकऱ्यांनी पांढरा पोशाख परिधान करावा व शिस्त पाळावी,सहभागी होणाऱ्या वारकरी भक्तांनी आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन अध्यक्ष भाऊसाहेब हरिश्चन्द्रे,सचिव राधाकिसन गांधले,उपाध्यक्ष सुभाष फुलारे,सहसचिव संभाजी गडाख ,गोरक्षनाथ गड देवस्थानचे अध्यक्ष एड शंकरराव कदम यांनी केले आहे अधिक माहितीसाठी संपर्क राम महाराज पोते-९८८१४४५८९२,किशोर महाराज गडाख-९९६०४७९९०९,डॉ प्रकाश जाधव- ९५५२०९३२२९, योगेश झिने-९५९५२१५५५५,नामदेव आव्हाड-९२२६३४८१५८,सिमाजी तांबे ९७६७४९३३७५, भगवान ढोकणे ७२७६८०१३३५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### फ्लेजलिंग्सच्या चिमुरड्यांनी मातांसह फायरलेस कुकिंगमधून जोपासली सर्जनशीलता



अहिल्यानगर - द आयकॉन पब्लिक स्कूलच्या फ्लेजलिंग्स विभागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मातांसोबत फायरलेस कुकिंग उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थी आणि त्यांच्या मातांना एकत्र शिकण्याची, सर्जनशीलतेला वाव देण्याची संधी मिळाली. घरी आई मुलांसाठी स्वयंपाक करत असते. शाळेतील या उपक्रमात मुलांना आईसह आनंददायी वातावरणात स्वयंपाक करण्याचा अनुभव मिळाला.विद्यार्थ्यांनी आपल्या मातांसह गॅस किंवा अग्नी साधनांचा वापर न करता विविध पौष्टिक व आरोग्यदायी खाद्यपदार्थ तयार करत सकस आहाराचे महत्त्व अनुभवले. प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संघभावना, जबाबदारीची जाणीव आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला.या उपक्रमाचा उद्देश केवळ स्वादिष्ट पदार्थ तयार करणे एवढाच नव्हता, तर विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह समृद्ध करणे, अन्नातील पोषणमूल्यांची जाणीव करून देणे, सहाध्यायांसोबत पदार्थ वाटून घेण्याची सवय विकसित करणे आणि अन्नाच्या माध्यमातून परस्परांतील स्नेह अधिक दृढ करणे होता. मातांनीही उत्साहाने सहभाग घेत आकर्षक, पौष्टिक आणि नाविन्यपूर्ण पदार्थ सादर करून उपक्रमाला प्रतिसाद देऊन शाळेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे सादरीकरण आत्मविश्वासाने केले तसेच त्यातील पोषणमूल्यांची माहितीही दिली.

# श्री ढोकेश्वर विद्यालयाचे ३५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

## जिल्हा गुणवत्ता यादीतील शिष्यवृत्ती पात्र विदयार्थ्यांचा जाहीर सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्यार्थी प्रसारक संस्थेच्या श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने पाचवी व आठवी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश मिळवले आहे. विद्यालयातील एकूण पस्तीस विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत. त्यापैकी पंचवीस विद्यार्थी इयत्ता पाचवीचे तर दहा विद्यार्थी हे इयत्ता आठवी चे पात्र झाले. तर तीन विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. त्यामध्ये इयत्ता पाचवीत चि. यश संदीप माकरे याने ३०० पैकी २२८ गुण आणि इयत्ता आठवीत चि. साई दत्तात्रय चिकणे याने ३०० पैकी २१८ गुण तर कु. अथश्री अजय ठुबे हिने ३०० पैकी २१६ गुण प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विदयार्थ्यांना कल्पना जाधव, सुमन वाळुंज यांनी मराठी विषयासाठी, पवार मिनाक्षी, वैशाली गायखे यांनी गणित विषयासाठी, सुरेखा ठाणगे, बाबासाहेब जाधव यांनी इंग्रजी विषयासाठी, अतुल सैद, माळवदे यांनी बुद्धिमत्ता विषयासाठी मार्गदर्शन केले, सराव परीक्षा घेऊन नियोजनबद्ध मार्गदर्शन केले.

गुणवत्ता यादीत आलेल्या तीनही विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, आणि बुके देऊन प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी रविंद्र मते, निलेश जासूद, संदीप महांडुळे, नारायण शेळके, श्रीरंग धामणे, सोनल रोहकले, निलम खिलारी, प्रिया डव्हणे, वर्षा भोंडवे, विष्णू भद्रे, संदीप खिलारी, पवन कुटे, भाऊसाहेब बांबेरे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, श्रीम. घोडके इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा.रा. ह. दरे साहेब, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर साहेब, सचिव अ‍ॅड विश्वासराव आठरे पाटील साहेब, सहसचिव मुकेशराव मुळे साहेब, खजिनदार अ‍ॅड दीपलक्ष्मी म्हसे पाटील, माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे साहेब, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम आण्णा खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, सरपंच सौ अरुणा खिलारी, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन नारायणराव झावरे, व्हा. चेअरमन व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लहू जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके तसेच टाकळी नगरीचे सर्व शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी संध्याताई सोनवणे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर–** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीवरील नामनिर्देशित सदस्य तसेच विशेष निमंत्रित सदस्यांची घोषणा केली असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) युवती प्रदेशाध्यक्ष संध्याताई उद्धव सोनवणे यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ६ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, जिल्हा नियोजनाच्या विविध विषयांतील अनुभव व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

संध्याताई सोनवणे या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) युवती प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभर कार्यरत असून, महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्न, ग्रामीण विकास आणि विविध लोकहिताच्या विषयांवर त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्याच्या विकास नियोजनात महिला प्रतिनिधित्व अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

त्यांच्या निवडीचे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी स्वागत केले असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पाथर्डी तालुक्यातील पाच गावांत कथित गुन्हेगारी टोळीचा धुमाकूळ; ग्रामस्थ भयभीत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील सोमठाणे, नलवडे बुद्रुक, वरूर, सुसरे, आखेगाव व कोरडगाव या गावांमध्ये काही व्यक्तींनी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी कथितपणे संघटित गुन्हेगारीचे जाळे उभे करून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर सुमारे ५०० ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन सादर करून संबंधितांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. तसेच तातडीने कारवाई न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार संतोष खवले, राहुल खवले, माणिक खवले, अमोल खवले, चिमाजी धनवडे व त्यांच्यासोबतच्या सुमारे वीस ते पंचवीस जणांनी परिसरात कथितपणे संघटित गुन्हेगारी सुरू केली आहे. जुगार, मटका, वाळू तस्करी, अवैध सावकारी, बेकायदेशीर ताबे घेणे आदी आर्थिक फायद्याच्या कथित बेकायदेशीर व्यवसायातून या टोळीने गावागावांत दहशत निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधितांकडून महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांना लोखंडी रॉड, लाकडी दांडे आणि तलवारीच्या धाकाने बेदम मारहाण करण्यात आली असून अनेकांवर जीवघेणे हल्ले झाले आहेत. काही प्रकरणांमध्ये कलम ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल असूनही संबंधित आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याचा आरोप करण्यात आला.

तसेच, काही आरोपींचे पोलिसांशी आर्थिक संबंध व नातेवाईक असल्यामुळे त्यांना संरक्षण मिळत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी निवेदनात केला. आरोपी पोलिसांसमोरूनही फरार झाल्याचा दावा करत, त्यांच्या दहशतीमुळे अनेक नागरिक तक्रार करण्यास धजावत नसल्याचे सांगितले. गुन्हा दाखल करणाऱ्यांच्या घरी रात्री जाऊन धमक्या देणे, गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव टाकणे असे प्रकार सुरू असल्याचाही आरोप करण्यात आला.ग्रामस्थांनी संबंधित आरोपी व काही पोलिसांच्या सीडीआर ( ) ची चौकशी करण्याची मागणी केली. तसेच शाळेसमोर सुरू असलेल्या कथित अवैध दारू व्यवसायावर तातडीने कारवाई करून संबंधितांवर मोका अंतर्गत गुन्हे दाखल करून अटक करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी पार्वती काकडे, अमोल नलवडे, रामेश्वर काकडे, आप्पासाहेब नलवडे, बुगाबी शेख, मनीषा नलवडे, अर्जुन काकडे यांच्यासह सुमारे ५०० ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये नवीन करिअर संधी कार्यशाळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांनी बदलत्या काळातील करिअरच्या विविध संधींची ओळख करून घेत भविष्यासाठी योग्य दिशा निश्चित करावी, या उद्देशाने द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर संधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत मना-स्पर्शा : कौन्सेलिंग अ‍ॅण्ड ट्रेनिंग सेंटरच्या समुपदेशक सुकन्या फणसळकर यांनी मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता, व्यक्तिमत्त्व आणि कौशल्यांची ओळख करून देण्यात आली. तसेच पारंपरिक करिअर क्षेत्रांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, डिझाइन, डिजिटल मीडिया, उद्योजकता, मानसशास्त्र यांसारख्या उदयोन्मुख करिअर संधींची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आत्मपरीक्षण, कौशल्यविकास, योग्य नियोजन आणि भविष्याभिमुख दृष्टिकोन यांचे महत्त्व समजले. तसेच स्वतःच्या क्षमता आणि आवडीनुसार योग्य करिअरची दिशा निवडण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. ही कार्यशाळा द आयकॉन पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेल्या कटिबद्धतेची साक्ष देणारी ठरली.

# डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतनात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर - सोलापूर रोडवरील नारायणडोह येथील डॉ. एन.जे. पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे एप्रिल - मे २६ मध्ये घेण्यात आलेल्या पदविका परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या निकालात पाच ही अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून या सर्व विद्यार्थ्यांचा सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे वतीने पारितोषिके भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख,खजिनदार दादासाहेब भोईटे,आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब पागीरे उपस्थित होते.

यंत्र अभियांत्रिकी विभागाचा पहिला आलेला रोहान शेख, विद्युत अभियांत्रिकीचा पहिला आलेला प्रज्योत धांगडे, स्थापत्य अभियांत्रिकीचा



(छाया : विजय मते)

पहिला आलेला विश्वजीत पवार, तर संगणक अभियांत्रिकीचे पहिले चार आलेले विद्यार्थी निलम सय्यद, दिव्या अंकम, कृष्णा रंगाटे, आदित्य राऊत व कृत्रिम बुद्धी मत्ता शाखेचा प्रतिक नागपूरे या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या या डॉ.एन.जे.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये प्रात्यक्षिकांसह उच्च दर्जाचे शिक्षण येथे मिळाले. उच्चशिक्षित प्राध्यापक यांच्यामुळे आम्ही घडलो. त्यावेळी विद्युत विभागाचे विश्वनाथ आदवडे यांनी सांगितले की नारायणडोह येथे तंत्रनिकेतन कॉलेज सुरू होऊन १६ वर्षे झाली,यावर्षीची १३ वी बॅच चे अभियंता होऊन विद्यार्थी बाहेर पडले आहेत. यामधील बहुतांशी विद्यार्थी चांगल्या क्षेत्रात नोकरी करीत आहेत. विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण व महापारेषण विभागात शासकीय कार्यालयात नोकरीत आहेत.असे श्री.आदवडे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.जयश्री होले यांनी केले तर आभार प्रदर्शन करताना प्राचार्य बाळासाहेब बोर्डे म्हणाले, अभियंत्यांनी नवनवीन ज्ञान आत्मसात करून नोकरीबरोबरच देशसेवा करावी.असे आवाहन केले.

# के. जी. कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स (रात्र) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे विश्वस्त श्री. किशोर मुनोत आणि कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी केले आहे.

महाविद्यालयामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.कॉम. (कॉम्प्युटर एप्लीकेशन) तसेच बीबीए (बिझनेस मॅनेजमेंट) या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. बी.कॉम. अभ्यासक्रमात बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग आणि बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन हे विशेष विषय उपलब्ध आहेत. याशिवाय महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे एमबीए अभ्यासक्रमाचे अधिकृत अध्ययन केंद्र ( ) कार्यरत असून, नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर शिक्षणाचीही उत्कृष्ट सुविधा उपलब्ध आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण () नुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पत्रकारिता, उद्योजकता विकास, टॅली, ऑफिस ऍडमिनिस्ट्रेशन व ऑफिस ऑटोमेशन, ट्रॅव्हल अँड टुरिझम, सॉफ्ट स्किल्स, पायथॉन, फ्रंट लाईन कम्युनिकेशन आणि रिसेप्शनिस्ट यांसारखे विविध कौशल्यवर्धक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संगणक साक्षरतेवर आधारित मोफत अभ्यासक्रमही महाविद्यालयात राबविण्यात येत आहेत.

महाविद्यालयामध्ये आधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, अनुभवी व पात्र प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी कल्याण उपक्रम, करिअर मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी प्रत्यक्ष संवाद तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. दिवसभर नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणांमुळे नियमित शिक्षण घेणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी रात्र महाविद्यालय ही शिक्षणाची एक उत्तम संधी उपलब्ध करून देत आहे.

यावेळी विश्वस्त श्री. किशोर मुनोत म्हणाले, ''उच्च शिक्षण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, हा संस्थेचा मूलभूत उद्देश आहे. शिक्षणात खंड पडलेल्या किंवा नोकरी-व्यवसाय सांभाळत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय अत्यंत उपयुक्त ठरत आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यावर आमचा भर आहे.'

कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी सांगितले, ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत रोजगाराभिमुख कौशल्ये मिळावीत यासाठी विविध नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. पदवी अभ्यासक्रमांसोबतच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एमबीए केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने कार्यरत आहे.

# श्रीगोंद्यावर वरुणराजाची दमदार कृपा; दमदार पावसाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** अनेक दिवसांच्या उकाड्यानंतर अखेर सोमवारी पहाटे श्रीगोंदा तालुक्यावर वरुणराजाने दमदार हजेरी लावली. जोरदार पावसामुळे संपूर्ण तालुक्याला दिलासा मिळाला असून नागरिकांसह शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. पहाटेपासून सुरू झालेल्या पावसाने वातावरणात गारवा निर्माण केला, तर उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

पावसाच्या सरींमुळे शहरातील प्रमुख रस्ते तसेच सखल भागात काही ठिकाणी पाणी साचले अनेक ठिकाणी निसर्ग पुन्हा एकदा बहरल्याचे चित्र दिसून आले. ग्रामीण भागातही पावसाचे उत्साहाने स्वागत करण्यात आले.

खरीप हंगामाच्या दृष्टीने हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. बाजरी, मका, तूर, कपाशी आदी पिकांना या पावसामुळे मोठे जीवदान मिळणार असून आधीच पेरणी झालेल्या शेतांतील पिकांना नवसंजीवनी मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. तालुक्यात काही भागात पेरण्या पूर्ण झाल्या असल्या, तरी अनेक ठिकाणी



पावसाअभावी शेतकरी प्रतीक्षेत होते. या पावसानंतर उर्वरित पेरण्यांनाही वेग येण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या पाणीटंचाईवरही या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विहिरी, शेततळी आणि लहान जलसाठ्यांमध्ये पाण्याची आवक सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस तालुक्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. एकूणच, वरुणराजाच्या या दमदार आगमनामुळे श्रीगोंदा तालुक्यात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी वर्गासाठी ही पावसाची सर आशेची नवी पहाट ठरत आहे.

# धनगर समाजाच्या मेळाव्यातून एकजुटीचा निर्धार; लोकमाता अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने धनगर समाजाचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात शहरात पार पडला. समाजातील एकजुटीचा संदेश या मेळाव्यातून देण्यात आला. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या या मेळाव्यात अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श राज्यकारभार, न्यायप्रियता, लोककल्याणकारी धोरणे आणि समाजसेवेच्या कार्याचा जागर करून उपस्थितांना प्रेरित करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य तुळशिराम भोजने होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, भीमराव जाधव, मुख्याध्यापक अशोक सूर्यवंशी, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर, विठ्ठल दातीर, पोपट मतकर, अनिल भदर्गे (जालना), ज्ञानेश्वर कांबळे, अजय जाडकर, सुनिता आदमाने यांच्यासह धनगर समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, उद्योजक आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पुरस्कारप्राप्तांचा विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला.

प्रास्ताविकात मेळाव्याचे संयोजक तथा यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर म्हणाले की, धनगर समाज हा परंपरेने कष्टकरी, स्वाभिमानी आणि राष्ट्रनिष्ठ समाज आहे. मात्र आजच्या स्पर्धेच्या युगात समाजाने शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि आधुनिक तंत्रज्ञान या क्षेत्रांत अधिक सक्षमपणे पुढे जाण्याची गरज आहे. समाजातील मतभेद विसरून एकत्र येणे, युवकांना दिशा देणे आणि गुणवंतांचा सन्मान करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आणि कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या आदर्शातून समाजात सेवा, समर्पण आणि नेतृत्वाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा मेळावा घेतल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य तुळशिराम भोजने म्हणाले की, समाजाच्या विकासाचा पाया हा शिक्षणात आहे. समाजातील प्रत्येक मुलगा आणि मुलगी उच्च शिक्षित झाली, तर समाजाची प्रगती आपोआप होईल. धनगर समाजाने शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकी या तीन सूत्रांवर पुढे वाटचाल केली तर समाजाची प्रगती निश्चित होईल.

# विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या हितासाठी आर. आर. केबल फाउंडेशन व निरंजन सेवाभावी संस्थेचे सामाजिक योगदान

**सावेडी येथील समर्थ प्रशाला आणि श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय विद्यालय,यांना अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर जलकुंभ भेट; शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आमची ही जलमोहीम– वेन्सी डाबरे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**'दान हे केवळ वस्तू देण्याचे नसते, तर समाजाच्या भविष्यात गुंतवणूक करण्याचे माध्यम असते.' या विचाराची प्रचिती देणारा प्रेरणादायी उपक्रम आर. आर. केबल फाउंडेशन व निरंजन सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडी येथील समर्थ प्रशाला व श्रमिकनगर येथील मार्केडेय विद्यालय येथे पार पडला. विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे शुद्ध, सुरक्षित आणि आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने शाळेला अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर जलकुंभ भेट देत सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण केला.

नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभाचा नळ सुरू करून लोकार्पण करण्यात आले. विशेष म्हणजे सर्व मान्यवरांनी एकाच वेळी जलकुंभाचे नळ सुरू करत या उपक्रमाचा शुभारंभ केला आणि ''प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शुद्ध पाणी'' हा संकल्प प्रत्यक्षात उतरविला.

आर आर केबल लिमिटेड चे सी एस आर फंड मॅनेजर वेन्सी डाबरे यांनी सांगितले की, ''शुद्ध पिण्याचे पाणी हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, आणि समाजात निरोगी पिढी घडावी, या उद्देशाने आमची ही जलमोहीम सुरू आहे.



भविष्यातही अशा अनेक शैक्षणिक संस्थांपर्यंत ही सेवा पोहोचविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.''

निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयेश कासट म्हणाले कि आपण दिलेला जलकुंभ हा योग्य ठिकाणी देण्यात आला याचा आनंद वाटतो असे उदगार काढले.

या कार्यक्रमास निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयेश कासट व पदाधिकारी अतुल डागा, स्वप्निल कुलकर्णी, मुकुंद धूत, धिरज भाटिया, किरण मनियार, सुमित चांडक, राहुल झवर तसेच श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, ॲड किशोर देशपांडे, सुनील जोशी, प्राचार्या वसुधा जोशी,मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक के. एम. कुलकर्णी तसेच पद्मशाली विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन, सचिव विनायक गुडेवार, शालेय समिती प्राथ चे अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्धम सर, शालेय समिती माध्य चे अध्यक्ष शंकरराव येमूल सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. तसेच व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समर्थच्या प्राचार्या सौ.जोशी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून दिलेला हा जलकुंभ आमच्यासाठी अमूल्य ठेवा आहे. आपल्या संस्थांची सामाजिक जाणीव, दानशूर वृत्ती आणि शिक्षण क्षेत्राबद्दलची सकारात्मक भूमिका अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यामुळे भविष्यात शाळेसाठी अत्यावश्यक असलेल्या इंटरॅक्टिव्ह पॅनेलसाठीही सीएसआर निधीतून सहकार्य करण्याचा आपण निश्चितच सकारात्मक विचार कराल, अशी आमच्या संपूर्ण शाळा परिवारातर्फे नम्र अपेक्षा आहे.' कार्यक्रमाचे प्रास्तविक मार्केडेयचे मुख्याध्यपक शशिकांत गोरे यांनी केले.

# उमेद सोशल फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन शैक्षणिक साहित्याचे वाटप

**शालेय परिसरात वृक्षारोपण करुन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागृती**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांचे उत्तम आरोग्य, दर्जेदार शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीचा संदेश देत उमेद सोशल फाउंडेशनच्या वतीने राहुरी येथील प्रगती विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर, शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचा संदेश देऊन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागृती निर्माण करण्यात आली.

हा कार्यक्रम श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रगती विद्यालयात शिवाजी प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष तथा राहुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील कोळसे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक जनार्दन पाटील गाडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी अनिल जाधव, उमेद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, उपाध्यक्ष कुणाल तनपुरे, खजिनदार संजय निर्मल, राहुरी फॅक्टरी शाखेचे सल्लागार रणजित लहारे, विजय लोंढे, रवी साखरे, रवी सुरेकर, भाऊसाहेब मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य व आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यानंतर शालेय परिसरात वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. जे. जाधव यांनी प्रास्ताविकात शाळेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उमेद सोशल फाउंडेशनने घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी मनापासून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी प्रेरणा निर्माण होत असून सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील समन्वय अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

`. प्रगती विद्यालयाचे जे काही प्रलंबित प्रश्न आहेत, ते संबंधित विभागांशी समन्वय साधून प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू. विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका आणि संबंधित यंत्रणा सकारात्मक असल्याचेही त्यांनी सांगितले. जनार्दन पाटील गाडे यांनी समाजातील सक्षम घटकांनी शिक्षण क्षेत्रासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे असे उपक्रम सातत्याने व्हायला हवेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासाला निश्चितच नवी दिशा मिळणार असल्याचे सांगितले.

उमेद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे म्हणाले की, उमेद सोशल फाउंडेशन केवळ मदतीपुरते मर्यादित नसून समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक जाणीवा या चार क्षेत्रांवर सातत्याने काम सुरु आहे. जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य, आरोग्य सेवा आणि आवश्यक मदत पोहोचविण्याचा संकल्प घेऊन कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमात आरोग्य अधिकारी बारगळ यांनी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत योग्य सवयी अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी कोळसे सर, देशमुख सर, जाधव सर, जगताप सर, मुसळे मॅडम, काटे मॅडम, राठोड मॅडम, देवरे मॅडम, साईभाई मॅडम, भाऊसाहेब पगारे, हरीश गाडे, गणेश इंगळे यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना मिळाली**

# शब्दगंध साहित्यिक परिषदेची शाब्बासकीची थाप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्यिक परिषदेचे १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन नुकतेच संपन्न झाले. त्या संदर्भात परिषदेची आभार सभा, संमेलन स्वागताध्यक्ष माननीय सुरेश बनसोडे नगरसेवक अहिल्या नगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे ,कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे , संस्थापक सचिव सुनील गोसावी इत्यादी मान्यवर व्यासपीठावर हजर होते. आभार सभेमध्ये संमेलनांमध्ये सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचा, साहित्यामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांचा, पुस्तक प्रकाशन झालेल्या साहित्यिकांचा, सत्कार करण्यात आले. याप्रसंगी कथालेखक, कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांचा देखील सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन , स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब देशमुख यांचा..माणसं अशी.. अन् तशीही.. या कथासंग्रहाचे प्रकाशन, प्रा डॉ माजी कुलगुरू अशोकराव ढगे ,डॉ. प्राचार्य बाळासाहेब सागडे, यांच्या शुभहस्ते शब्दगंध संमेलनमध्ये पार पडले होते. धाराशिव येथे नुकत्याच संपन्न झालेल्या ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन मध्ये बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन लक्षवेधी ठरले होते. त्याचप्रमाणे अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषदचे भीमथडी मराठी साहित्य संमेलन मध्ये बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन सत्र अध्यक्ष म्हणून बहुमान मिळालेला होता. शिवाबाबा साहित्यिक परिषदेचा कथा सन्मान, जलालपूर येवला येथे, संमेलनध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक माननीय नंदकुमार राऊत यांच्या शुभहस्ते, ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे यांच्या उपस्थितीत झाला होता. या सर्व साहित्यिक कार्याबद्दल, शब्दगंध परिवाराने शाब्बासकीची थाप, कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ कवयित्री शर्मिला गोसावी यांनी केले. याप्रसंगी बबनराव गिरी, डॉ तुकाराम गोंदकर, प्रा डॉ अनिल गर्जे, प्रशांत सूर्यवंशी, प्रा डॉ अशोक कानडे, दिगंबर गोंधळी, बाळासाहेब कोठुळे , राजेंद्र चोभे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# संकटग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या मदतीसाठी धावले रविंद्र राजदेव

**तातडीच्या नुकसानभरपाई व घरकुलाची केली मागणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** सतत कोसळणाऱ्या पावसाने एका शेतकरी कुटुंबाच्या डोक्यावरचे छप्परच संकटात आणले आहे. पारनेर तालुक्यातील सावरगाव येथील चिकणेवाडीमध्ये राहणारे शेतकरी पुंडलिक गोविंद चिकणे यांच्या घराच्या पुढील व मागील बाजूच्या दगडी भिंती अचानक कोसळल्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे भिंती पूर्णपणे ढासळल्या. उर्वरित भिंतींनाही मोठे तडे गेल्याने घर कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत आहे. जीव मुठीत धरून जगण्याची वेळ या कुटुंबावर आली आहे.

या दुर्घटनेत सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. घरात असलेल्या चांगुणाबाई चिकणे व त्यांचा मुलगा त्या क्षणी घराबाहेर असल्यामुळे अनर्थ टळला. मात्र आयुष्यभराच्या कष्टातून उभारलेले घर क्षणात उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक आघात झाला आहे. आता या कुटुंबासमोर सुरक्षित निवाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

घटनेची माहिती मिळताच टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी संबंधित तलाठी व महसूल अधिकाऱ्यांना बोलावून पंचनामा करून घेतला आणि शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून त्वरित आर्थिक मदत मंजूर करण्याची मागणी केली. तसेच चिकणे कुटुंबाची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना तातडीने घरकुल योजनेचा लाभ देण्याची मागणीही प्रशासनाकडे केली. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक शिवाजीशेठ बेलकर, सावरगावचे उपसरपंच बाळा चिकणे, भानुदास आग्रे, नवनाथ गांजे, रमेश घोलप, रवींद्र चौधरी, पांडुरंग जेडगुले, तलाठी भालेकर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. ''निसर्गाच्या एका तडाख्याने गरीब शेतकरी कुटुंबाचा संसार उघड्यावर आला आहे. अशा संकटग्रस्त कुटुंबाला केवळ पंचनामे नव्हे, तर तातडीची मदत आणि कायमस्वरूपी निवाऱ्याची गरज आहे,'' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## जलजीवन गैरव्यवहारप्रकरणी चार अधिकाऱ्यांचे निलंबन

खासदार नीलेश लंके यांनी या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा तत्कालीन आमदार असतानाच सुरू केला होता. डिसेंबर २०२३ मध्ये नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील कथित गैरव्यवहार विधानसभेत मांडला होता. निविदा प्रक्रियेत अपात्र ठेकेदारांना बनावट कागदपत्रांच्या आधारे पात्र ठरविण्यात आल्याचा तसेच संबंधित अधिकारी व ठेकेदारांनी संगनमत करून शासनाची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप त्यांनी सभागृहात केला होता.

विशेषतः पारनेर तालुक्यातील जामगावसह सहा गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा मुद्दा त्यांनी पुराव्यांसह उपस्थित केला होता. संबंधित योजनेत केवळ २५ ते ३० टक्के काम पूर्ण झाले असताना काम पूर्ण झाल्याचे दाखवून बनावट पूर्णत्व अहवाल सादर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला होता. या प्रकारामुळे शासनाची दिशाभूल झाली असून, जनतेला मात्र पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले होते.

लोकसभेवर निवडून गेल्यानंतरही खासदार लंके यांनी हा प्रश्न सातत्याने लावून धरला. संसदेत त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च होऊनही नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नसल्याची वस्तुस्थिती मांडली. त्यानंतर नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन जिल्ह्यातील सर्व जलजीवन मिशन योजनांचे स्वतंत्र थर्ड पार्टी ऑडिट करण्याची मागणी केली. कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात अपूर्ण असलेल्या योजनांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत राज्य शासनाने संबंधित कामांची तपासणी केली. तपासणीत अनेक कामांमध्ये गंभीर त्रुटी, निकृष्ट दर्जा आणि अनियमितता आढळून आल्याने चार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना खासदार निलेश लंके म्हणाले, ''जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळण्याची ही केवळ सुरुवात आहे.

जलजीवन मिशनमधील प्रत्येक कामाची सखोल, पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी अधिकारी, ठेकेदार किंवा संबंधित व्यक्ती कितीही प्रभावशाली असली तरी जनतेच्या पैशाचा अपव्यय करणाऱ्यांना माफी मिळणार नाही. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक गावाला शुद्ध पिण्याचे पाणी मिळेपर्यंत आणि प्रत्येक रुपयाचा योग्य वापर झाल्याची खात्री होईपर्यंत माझा संघर्ष सुरूच राहील.खासदार लंके यांनी या कारवाईबद्दल राज्य शासनाचे आभार व्यक्त करत, ही केवळ सुरुवात असून जलजीवन मिशनअंतर्गत झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करून ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी शासनाकडे केली आहे.

## महावितरणाने दखल न घेतल्यानेच दुर्दैवी घटना घडली – आ.संग्राम जगताप

आहोत आणि पुढेही करत राहणार आहोत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी महावितरणने शहरातील धोकादायक विद्युत यंत्रणेची तपासणी करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे असते. मात्र, त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. झाडांच्या फांद्या तोडून त्या रस्त्यावरच टाकल्या जातात, त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे. काही एजन्सींकडून वाकडे व निकृष्ट दर्जाचे वीज खांब उभारले जात असून त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे.

ते पुढे म्हणाले, ''अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच या निष्पाप चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे वेळेत लक्ष दिले असते तर आज ही घटना घडली नसती. अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, माजी नगरसेवक संभाजी पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

आंदोलनानंतर महावितरण प्रशासनाच्या वतीने बालिकेच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत म्हणून २० हजार रुपयांचा धनादेश स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर व माजी नगरसेवक संभाजी पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

## अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिव पाणंद जनजागरण यात्रेला प्रारंभ

कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण लाभले.

यावेळी अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीतील विकासाचे उदाहरण देत शेतरस्त्यांमुळे ग्रामविकासाला गती मिळते, असे सांगितले. तसेच शरद पवळे यांच्या सामाजिक कार्यामुळे नारायणगव्हाण व राळेगणसिद्धी यांच्यातील संबंध अधिक दृढ झाल्याचे नमूद करत शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन न्याय देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनीही शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला कायम पाठिंबा देण्याची ग्वाही दिली. जोरदार पाऊस सुरू असतानाही राज्यभरातून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अण्णा हजारे यांचे स्वीय सहायक दत्ता आवारी, रामदास सातकर, नाना आवारी यांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी शरद पवळे, रविंद्र खुडे, नाथाभाऊ शिंदे, बाळासाहेब थोरात, सुरेश वाळके, विजय शेलार, सचिन शेळके, मनोहर मतकर, आंबादास आव्हाड, पोपट शेळके, शांताराम पानमंद, विठ्ठल निर्मळ, अशोक कचरे, शिवाजी राऊत, राहुल गट, युवराज कानसकर, विजय दळवी, नाना शिंदे, दशरथ वाळूंज, भाऊसाहेब वाळूंज, बबन दाभाडे, शिराज पठाण, दत्तात्रय बांगर, थोरवे आदींसह राज्यभरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.